निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
बुधवार
२८ जानेवारी २०२६
पाने: ०४ किंमत: २ .००
वर्ष: १५ वे अंक: ३३३ वा

RNI.No.MAH/MAR2011/39247

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. G 2/RNP/AGD-441/2024-26 | मुख्य संपादक- सुग्रीव मुंढे

## ‘मी मातीकाम करेन, पण बाबासाहेबांना विसरणार नाही!’ नाशिकमध्ये महिला कर्मचारी कडाडली

### मंत्री गिरीश महाजनांसमोरच संताप व्यक्त

**आत्ताच एक्सप्रेस**

**नाशिक/ प्रतिनिधी/** देशभरात आज प्रजासत्ताक दिनाचा उत्साह असतानाच, नाशिकच्या जिल्हाधिकारी कार्यालयातील शासकीय ध्वजारोहण सोहळ्यात एक मोठा पेच निर्माण झाला. राज्याचे ग्रामविकास मंत्री आणि नाशिकचे पालकमंत्री गिरीश महाजन यांच्या भाषणात संविधान निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाचा उल्लेख नसल्याने, वन विभागाच्या एका महिला कर्मचाऱ्याने थेट मंत्र्यांसमोरच आपला संताप व्यक्त केला. मला सस्पेंड करा, मी मातीकाम करेन, पण बाबासाहेबांना संपवण्याचे काम सहन करणार नाही, अशा शब्दांत या महिलेने सत्ताधाऱ्यांना आरसा दाखवला.

**नेमकं प्रकरण काय?**

प्रजासत्ताक दिनानिमित्त नाशिकमध्ये पालकमंत्र्यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी मंत्री गिरीश महाजन यांनी उपस्थितांना संबोधित केले. मात्र, आपल्या भाषणात त्यांनी अनेक नावांचा उल्लेख केला, पण ज्या संविधानामुळे हा दिवस साजरा होतो, त्या संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव घेणे टाळले, असा आरोप वन विभागात कार्यरत असलेल्या माधवी जाधव या महिला कर्मचाऱ्याने केला.

**प्रशासनाची धावपळ, तणावाचे वातावरण**

भर कार्यक्रमात एका सरकारी कर्मचाऱ्याने मंत्र्यांना अशा प्रकारे थेट सवाल केल्याने प्रशासनाची मोठी धावपळ उडाली. या घटनेमुळे काही काळ कार्यक्रमस्थळी तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. या प्रकरणावर आता राजकीय वर्तुळातून काय प्रतिक्रिया येतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



**संविधानामुळेच तुम्ही मंत्री आहात!**

मंत्री महाजन यांचे भाषण सुरू असतानाच माधवी जाधव यांनी आक्रमक पवित्रा घेत त्यांना जाब विचारला. त्या म्हणाल्या: पालकमंत्री हे आज संविधानामुळेच त्या पदावर बसले आहेत. देशात समानता आणि लोकशाही केवळ संविधानामुळे आहे. जे लोक लोकशाहीला कारणीभूत नाहीत, त्यांची नावे भाषणात वारंवार घेतली जातात; मग ज्यांनी हे संविधान दिले, त्या मानकरी महामानवाचे नाव घ्यायला विसर पडतोच कसा?

**‘सस्पेंड करा, पण झुकणार नाही’**

या घटनेनंतर पोलिसांनी तातडीने माधवी जाधव यांना ताब्यात घेण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी त्यांनी अत्यंत आक्रमकपणे आपली भूमिका मांडली. मला सस्पेंड करायचे असेल तर खुशाल करा, मी मातीकाम करून पोट भरेन. पण बाबासाहेबांचे नाव पुसून टाकण्याचे काम होत असेल, तर मी गप्प बसणार नाही, असे त्यांनी ठणकावून सांगितले. त्यांच्या या धाडसी पवित्र्याचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होत असून नेटिझन्सकडून त्यांच्या धैर्याचे कौतुक होत आहे.

---

### संक्षिप्त



## जालना जिल्हा परिषदेत प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा; कर्तव्यदक्ष कर्मचारी पंजाब खिल्लारे यांचा विशेष सन्मान

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी/**जालना जिल्हा परिषदेत ७७ वा भारतीय प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या मंगलप्रसंगी, जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागात प्रदीर्घ काळ सेवा बजावून सेवानिवृत्त झालेले कनिष्ठ सहाय्यक पंजाब संपतराव खिल्लारे यांचा त्यांच्या उल्लेखनीय सेवेबद्दल विशेष सत्कार करण्यात आला.पंजाब खिल्लारे हे जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागात कनिष्ठ सहाय्यक पदावर कार्यरत होते. आपल्या संपूर्ण सेवाकाळात त्यांनी अत्यंत प्रामाणिकपणे, शिस्तप्रियतेने आणि कर्तव्यदक्षतेने काम केले. ३० जून २०२५ रोजी ते आपल्या नियत वयोमानानुसार शासकीय सेवेतून सेवानिवृत्त झाले होते. त्यांनी जिल्हा परिषदेच्या प्रशासकीय कामात दिलेले योगदान आणि शिक्षण विभागातील त्यांची कामगिरी लक्षात घेऊन प्रशासनाच्या वतीने त्यांचा गौरव करण्याचा निर्णय घेण्यात आला.

सोमवारी, २६ जानेवारी २०२६ रोजी प्रजासत्ताक दिनाच्या मुख्य ध्वजारोहण कार्यक्रमानंतर आयोजित सोहळ्यात, जालना जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी. एम. यांच्या हस्ते पंजाब खिल्लारे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांना:

सन्मानपत्र,सन्मानचिन्ह आणि पुष्पगुच्छ देऊन त्यांच्या सेवापूर्तीचा गौरव करण्यात आला. यावेळी बोलताना मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी खिल्लारे यांच्या कार्याचे कौतुक केले आणि अशा कर्तव्यदक्ष कर्मचाऱ्यांमुळेच प्रशासकीय कामाचा दर्जा टिकून राहतो, अशा भावना व्यक्त केल्या.

या सोहळ्याप्रसंगी जिल्हा परिषदेचे विविध विभागांचे विभाग प्रमुख, अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी पंजाब खिल्लारे यांना त्यांच्या पुढील सुखी, समाधानी आणि आरोग्यदायी सेवानिवृत्त जीवनासाठी भरभरून शुभेच्छा दिल्या. आपल्या सत्काराला उत्तर देताना खिल्लारे यांनी जिल्हा परिषद प्रशासनाचे आभार मानले.







---

### गडचिरोलीचा थरार अन् सन्मान!

## १२१ पैकी ३१ शौर्य पदके एकट्या गडचिरोलीला; नक्षलवाद्यांचा कर्दनकाळ ठरलेल्या जवानांचा डंका

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/गडचिरोली/ प्रतिनिधी/**

देशाच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला शौर्य आणि कर्तृत्वाचा नवा इतिहास रचला गेला आहे. जगातील सर्वात कठीण मानल्या जाणाऱ्या नक्षलविरोधी मोहिमांमध्ये आपल्या प्राणांची बाजी लावणाऱ्या गडचिरोली पोलीस दलाने देशात पुन्हा एकदा आपले नाव सुवर्ण अक्षरात कोरले आहे. देशात जाहीर झालेल्या एकूण १२१ शौर्य पदकांपैकी तब्बल ३१ पदके एकट्या गडचिरोलीच्या वाघांनी पटकावून नक्षलवाद्यांना चोख प्रत्युत्तर दिले आहे.

प्रमुख सन्मानित: पोलीस निरीक्षक अमोल फडतरे, उपनिरीक्षक मधुकर नैताम, वासुदेव मडावी, विलास पोरतेट, संतोष नैताम यांच्यासह ३१ जवानांच्या छातीवर आता शौर्याचे पदक झळकणार आहे. मरणोत्तर सन्मान: कर्तव्य बजावताना वीरगती प्राप्त झालेल्या १४ शहीद जवानांचा मरणोत्तर सन्मान करून त्यांच्या बलिदानाला सलाम करण्यात आला आहे.

**पदोन्नतीचा पाऊस:** जवानांचे मनोबल उंचावले

केवळ पदकेच नाहीत, तर ३९४ पोलीस अंमलदारांना पदोन्नती देण्यात आली आहे. यामध्ये ७ शहीद हवालदारांना 'सहायक पोलीस उपनिरीक्षक' तर ७ पोलीस नाईकांना 'पोलीस हवालदार' पदी मरणोत्तर पदोन्नती जाहीर झाली आहे. याशिवाय ८२ हवालदार आणि ३०३ पोलीस नाईकांनाही पदोन्नतीचा लाभ मिळाला आहे.

**पद्म पुरस्कारांची घोषणा: रोहित शर्मा, कोश्यारी आणि धर्मेंद्र यांचा मोठा सन्मान**

केंद्र सरकारने प्रजासत्ताक दिनानिमित्त १३१ जणांच्या नावांची पद्म पुरस्कारांची घोषणा केली आहे. यामध्ये महाराष्ट्रातील दिग्गजांचा वरचष्मा पाहायला मिळत आहे.

**महाराष्ट्राचे मानकरी:**

१. धर्मेंद्र (मरणोत्तर): चित्रपटसृष्टीतील योगदानाबद्दल त्यांना 'पद्मविभूषण' जाहीर झाला आहे. २. भगतसिंह कोश्यारी: महाराष्ट्राचे माजी राज्यपाल यांना सार्वजनिक क्षेत्रातील कार्यासाठी 'पद्मभूषण' देऊन गौरविण्यात आले आहे. ३. रोहित शर्मा: भारतीय क्रिकेट संघाचा कर्णधार 'हिटमॅन' रोहित शर्माला खेळातील अतुलनीय कामगिरीसाठी 'पद्मश्री' जाहीर झाला आहे. ४. अशोक खाडे: उद्योग क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यासाठी त्यांना 'पद्मश्री' देण्यात आला आहे. ५. रघुवीर खेडकर: लोककलेचे उपासक आणि तमाशा क्षेत्रातील दिग्गज व्यक्तिमत्त्व रघुवीर खेडकर यांचा 'पद्मश्री'ने सन्मान करण्यात आला आहे.



**४० नक्षलवाद्यांचा खात्मा करणाऱ्या मोहिमेचा गौरव**

ही केवळ पदके नसून २२ एप्रिल २०१८ रोजी बोरीया-कसनासूरच्या जंगलात गाजवलेल्या अभूतपूर्व पराक्रमाची पोचपावती आहे. त्या ऐतिहासिक चकमकीत एकाच वेळी ४० नक्षलवाद्यांना कंठस्नान घालून गडचिरोली पोलिसांनी शत्रूचे कंबरडे मोडले होते.

**भंडाऱ्याचे नाव उज्ज्वल: गंगाधर घुमरे यांना राष्ट्रपती पदक**

भंडाऱ्याच्या राज्य गुप्त वार्ता विभागाचे पोलीस उपनिरीक्षक गंगाधर घुमरे यांनी जिल्ह्याची मान अभिमानाने उंच केली आहे. १९९१ च्या बॅचचे अधिकारी असलेल्या घुमरे यांना त्यांच्या उत्कृष्ट सेवेबद्दल (चडच्) राष्ट्रपती पदक जाहीर झाले आहे. भंडारा जिल्ह्यातून पदक मिळवणारे ते एकमेव पोलीस अधिकारी ठरले आहेत.

थोडक्यात सांगायचे तर: गडचिरोलीच्या घनदाट जंगलात नक्षलवाद्यांना धूळ चारणाऱ्या जवानांपासून ते क्रीडा आणि कला क्षेत्रातील दिग्गजांपर्यंत आज संपूर्ण देश महाराष्ट्राच्या कर्तृत्वाला सलाम करत आहे.

---

## जालन्यातील वाढत्या गुन्हेगारीला गुन्हेगारच जबाबदार

### पालकमंत्री पंकजा मुंडेंच्या विधानाने राजकीय वर्तुळात खळबळ

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/बीड/ प्रतिनिधी/**

जालन्यात गेल्या काही दिवसांपासून खून, मारहाण आणि चाकू हल्ल्यांसारख्या गंभीर गुन्ह्यांचे सत्र सुरू आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी केलेल्या एका विधानाने सर्वांच्या भुवया उंचावल्या आहेत. जालन्याच्या वाढत्या गुन्हेगारीला गुन्हेगारच जबाबदार आहेत, असे अजब विधान त्यांनी केले असून, यामुळे नव्या वादाला तोंड फुटण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

**‘जालन्याची बदनामी टाळा’; पालकमंत्र्यांचा अजब सल्ला** : जालन्यातील कायदा आणि सुव्यवस्थेबाबत भाष्य करताना पंकजा मुंडे म्हणाल्या की, जालन्यातील गुन्हेगारीला इथले गुन्हेगारच जबाबदार आहेत. बाहेरचे लोक येऊन इथे क्राईम करत नाहीत, तर जालन्यातीलच लोक हे करत आहेत. तसेच, आपण ज्या भागात राहतो, त्या भागाची अनावश्यक बदनामी होणार नाही याची काळजी प्रत्येकाने घेतली पाहिजे, असा सल्लाही त्यांनी यावेळी दिला.

मात्र, पालकमंत्र्यांच्या या विधानानंतर मग पोलीस प्रशासन नेमके कशासाठी? असा प्रश्न सर्वसामान्य जनतेतून आणि विरोधकांकडून उपस्थित केला जात आहे. गुन्हेगारी रोखणे आणि गुन्हेगारांवर वचक बसवणे ही पोलिसांची जबाबदारी असताना, पालकमंत्र्यांनी गुन्हेगारीचे खापर थेट गुन्हेगारांवर फोडून प्रशासकीय जबाबदारी झटकल्याची चर्चा आता रंगू लागली आहे.

**बीडमध्ये प्रजासत्ताक दिनी शेतकऱ्याचा आत्मदहनाचा प्रयत्न** : एकीकडे जालन्यात गुन्हेगारीचा प्रश्न ऐरणीवर असताना, शेजारील बीड जिल्ह्यातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाबाहेर सखाराम बागलाने या शेतकऱ्याने अंगावर डिझेल ओतून आत्मदहन करण्याचा प्रयत्न केला.

**नेमके प्रकरण काय? :** रेल्वे संपादन आणि नुकसान: बीड तालुक्यातील काकडहिरा येथे रेल्वे विभागाने जमीन संपादित केली आहे. या ठिकाणी १२ ते १५ मीटर उंचीचा मातीचा भराव केल्यामुळे पावसाचे पाणी शेतकऱ्याच्या शेतात साचून पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे. प्रशासनाचे दुर्लक्ष: पीडित शेतकरी २०१६ पासून या समस्येबाबत प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा करत होता.

**राजकीय पडसाद उमटण्याची शक्यता** : जालन्यातील गुन्हेगारीवरून पंकजा मुंडे यांनी केलेले विधान आणि बीडमधील शेतकऱ्याची हतबलता, या दोन्ही घटनांमुळे राज्य सरकार आणि स्थानिक प्रशासनावर विरोधकांकडून जोरदार टीका होण्याची चिन्हे आहेत.

**प्रजासत्ताक दिनी टोकाचे पाऊल**

वारंवार तक्रार करूनही दखल घेतली जात नसल्याने, अखेर प्रजासत्ताक दिनी या शेतकऱ्याने आत्मदहनाचा प्रयत्न केला. सुदैवाने, घटनास्थळी उपस्थित असलेल्या पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप केल्याने मोठा अनर्थ टळला. सध्या पोलिसांनी या शेतकऱ्याला ताब्यात घेतले असून, प्रशासन या प्रकरणाची सखोल माहिती घेत आहे.

---

## संभाजी भिडेंची जीभ घसरली! शरद पवारांना म्हटलं 'राष्ट्रद्रोही'; महाराष्ट्राच्या राजकारणात संतापाची लाट

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/रायगड/ प्रतिनिधी/** आपल्या प्रक्षोभक आणि वादग्रस्त विधानांसाठी ओळखले जाणारे शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानचे संस्थापक संभाजी भिडे यांनी पुन्हा एकदा राजकीय वर्तुळात खळबळ उडवून दिली आहे. रायगड जिल्ह्यातील किल्ले मोहिमेदरम्यान बोलताना भिडेंनी राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वे सर्वा शरद पवार यांच्यावर अत्यंत खालच्या पातळीवर जाऊन टीका केली आहे. पवारांना थेट 'राष्ट्रद्रोही' संबोधल्याने राज्याच्या राजकारणात मोठा वणवा पेटण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

**नेमकं प्रकरण काय? :** संभाजी भिडे यांची सध्या कर्जत परिसरातील लोहगड आणि विसापूर परिसरात 'धारातीर्थ यात्रा' सुरू आहे. या मोहिमेदरम्यान कार्यकर्त्यांना संबोधित करताना भिडेंनी शरद पवारांवर जहरी टीका केली.



शरद पवार म्हणजे राष्ट्रद्रोह, ते जातिवंत आहेत. ते देशातील बदमाश आणि *खोर आहेत. राज्यातील लवासासारखी कीड आता मुळासकट काढून टाकली पाहिजे, असे खळबळजनक विधान भिडेंनी केले.

या विधानाचे पडसाद उमटायला सुरुवात झाली असून, भिडेंनी वापरलेल्या आक्षेपार्ह शब्दांमुळे राष्ट्रवादी काँग्रेसच्या (शरद पवार गट) कार्यकर्त्यांमध्ये प्रचंड संताप पाहायला मिळत आहे.

**राजकीय प्रतिक्रिया: 'हे महाराष्ट्र सहन करणार नाही!' :** भिडेंच्या या विधानानंतर राजकीय नेत्यांकडून कडक शब्दांत निषेध व्यक्त केला जात आहे: अंबादास दानवे (विरोधी पक्षनेते, विधान परिषद): शरद पवार हे महाराष्ट्रासाठी झिजणारे नेतृत्व आहे. त्यांच्यावर अशा प्रकारे देशद्रोहाचा आरोप करणे अत्यंत चुकीचे आणि निंदनीय आहे. ही महाराष्ट्राची संस्कृती नाही. शंभुराज देसाई (मंत्री, राज्य सरकार): सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांनी मात्र या विषयावर सावध पवित्रा घेतला आहे. भिडेंनी नेमके काय आणि कोणत्या संदर्भात वक्तव्य केले, हे तपासावे लागेल. पूर्ण संदर्भ समजल्याशिवाय बोलणे योग्य नाही, असे म्हणत देसाईंनी प्रतिक्रिया देण्याचे टाळले.

---

## पैठणच्या सुपुत्राची सातासमुद्रापार गवसणी; इंग्लंडच्या लीड्स युनिव्हर्सिटीतून 'क्रिमिनॉलॉजिस्ट' पदवी संपादन

**आत्ताच एक्सप्रेस**

**पैठण /प्रतिनिधी.बबन उदावंत/**

जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर ग्रामीण भागातील तरुणही जागतिक स्तरावर आपला ठसा उमटवू शकतात, हे पैठण तालुक्यातील गांगलवाडी (पुनर्वसित) येथील सुपुत्राने सिद्ध केले आहे. बॅरिस्टर महेश सिमा प्रभाकर आडसुळ याने इंग्लंडमधील जगप्रसिद्ध लीड्स युनिव्हर्सिटीतून 'क्रिमिनॉलॉजी अँड क्रिमिनल जस्टिस' (गुन्हे शास्त्र) या विषयात विशेष प्रावीण्यासह पदवी प्राप्त करून पैठण तालुक्याचे नाव सातासमुद्रापार झळकावले आहे.

**टॉप १० मध्ये मिळवले स्थान :** महेश आडसुळ याने केवळ ही पदवी पूर्ण केली नाही, तर विद्यापीठाच्या गुणवत्ता यादीत प्रथम १० विद्यार्थ्यांमध्ये मानाचे स्थान पटकावले आहे. एका ऐतिहासिक नगरीतून गेलेल्या तरुणाने परदेशात जाऊन मिळवलेले हे यश संपूर्ण जिल्ह्यासाठी अभिमानास्पद ठरले आहे. शिक्षण पूर्ण करून मायदेशी परतल्यानंतर त्यांचे जंगी स्वागत करण्यात आले.



**दुर्गा गार्डन लॉन्समध्ये भव्य सत्कार सोहळा :** आपल्या मुलाने आई-वडिलांचे स्वप्न सत्यात उतरवल्याबद्दल आडसुळ परिवाराच्या वतीने पैठण शहरातील दुर्गा गार्डन लॉन्स येथे एका भव्य सत्कार समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला तालुक्यातील विविध क्षेत्रांतील मान्यवर, नातेवाईक आणि मित्रमंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होती. अत्यंत थाटामाटात पार पडलेल्या या सोहळ्यात महेशचा गौरव करून त्याला पुढील उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या.

**तालुक्यात आनंदाचे वातावरण :** ऐतिहासिक वारसा लाभलेल्या पैठणच्या भूमीतील एक तरुण आता 'गुन्हे शास्त्रज्ञ' म्हणून ओळखला जाणार आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी महेशचा आदर्श घ्यावा, अशा भावना उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केल्या. आपल्या यशाचे श्रेय महेशने आई-वडील आणि त्याला मार्गदर्शन करणाऱ्या गुरूंना दिले आहे.

# विद्रभ साहित्य संघाची निवडणूक

विदर्भ साहित्य संघ. या संघातून बऱ्याच लोकांचं सार्थक झालं. ज्यांचं सार्थक झालं. त्यांचे कॉलर टाईट झाले व ते कॉलर टाईट असल्यागत वागतात. ते इतर लोकांना तुच्छ समजतात. हे बरेच वेळेस दिसून आलं. साधं विदर्भ साहित्य संघामार्फत अखिल भारतीय साहित्य संमेलनात करायला मिळालेलं प्रतिनिधीत्व अशाच काही लोकांची कॉलर टाईट होणारा योग असतो. हेही दिसून येतो व खंत वाटायला लागते की आपण एवढे जुने सदस्य व एवढं लिहिणारे असूनही आपण मागे का राहिलो याची. कारण नव्यांना संधी मिळते आणि जुने सुटत जातात. कधीकधी जे संपर्कात असतात. ते साहित्यीक नसतातच व जे संपर्कात नसतात. तेच साहित्यीक असल्याचं अनुभवायला येत असतं. असं जेव्हा घडतं. तेव्हाच लोकं विदर्भ साहित्य संघाच्या निवडणुकीत उभे राहात असतात. यात शंका नाही.

आगामी काळात विदर्भ साहित्य संघाची निवडणूक होवू घातलेली आहे व या निवडणुकीत केवळ साहित्यीकच नाही तर गिरीश गांधींच्या रुपानं राजकारणीही उभे आहेत. जे राजकारणाच्या सर्वच दिग्गजांशी अगदी जवळचा संबंध ठेवतात. ज्यांना साहित्याचं कळतं की नाही. हे माहीत नाही. परंतु विदर्भ साहित्य संघाच्या निवडणुकीत उभे राहून मीही साहित्यीक आहे असे भासवत आहेत.

विदर्भ साहित्य संघाची ही निवडणूक आज अगदी प्रतिष्ठेची ठरलेली असून आजपर्यंत बऱ्याच दिवसांपासून तिथं निवडणुकाच झाल्या नाहीत. अगदी सामोपचारानं गड राखला गेला व गडाचे शिलेदार ठरत गेले.

आजपर्यंत म्हणजेच बरेच दिवसपर्यंत विदर्भ साहित्य संघाची निवडणूक झाली नाही. त्याच्या कारणाचा विचार केल्यास पहिलं कारण समोर येतं. ते म्हणजे कंपू मानसिकता. तिथे असलेले त्यावेळचे अध्यक्ष हे दुरदर्शी स्वभावाचे होते. त्यातच काही अध्यक्ष हे साहित्यीक जरी नसले तरी ते हुकूमत पद्धतीनं वागले. त्यांनी कोणत्याच सदस्यांना त्यांच्या त्यांच्या गरजेनुसार मनानं सदस्यत्व बहाल केलं नव्हतं. केवळ पैशानं सदस्यत्व दिलं होतं. याचाच अर्थ असा की कोणालाच बोलकं होवू दिलं नव्हतं. असा होतो. यावेळेस सर्वच सदस्य निवडणुकीच्या रिंगणात आहेत. त्याचं कारण प्रत्येकांना विद्यमान अध्यक्षांनी बोलकं केलेलं आहे असा होत नाही तर आजपर्यंत त्यांची जी हेळसांड झाली. त्यामुळंच ते बोलके झालेले आहेत व आज ते निवडणुकच्या रिंगणात उभे आहेत. मात्र यावरुन विद्यमान अध्यक्षानं काहीच केलं नाही. असा याचा अर्थ होत नाही. त्यांनीही बऱ्याच सदस्यांच्या गरजा जोपासल्या. त्यांच्या भावना जागवल्या व त्यांना ते कोण आहेत? हे सांगीतलं. हे विसरुन चालणार नाही. विद्यमान अध्यक्षांनी जी उपक्रमं घेतलीत. ती इतर कोणीही घेतलेली नाहीत. यापुर्वी ज्यांनी विदर्भ साहित्य संघ ही एक घरगुती संस्थाच ठेवली.

सध्याचा काळ हा निवडणुकीचा असून आताच निवडणूक का उभी राहिली? याचं उत्तर आहे राग. बऱ्याच दिवसांपासून राग धुमसत होता. तो राग होता, विदर्भ साहित्य संघाच्या उपक्रमात कोणाला सहभागी करुन न घेणं. त्यांच्या कार्यक्रमांना सन्मानानं न बोलावणं. तसं पाहिल्यास कोणत्याच सदस्यांना ओळखपत्र न देणं. त्यातच एखादा सदस्य तिथं गेल्यास ओळखपत्र नसल्यानं तेथील गाडी स्टँडचे चौकीदारही अरेरावी करत होते. तसंच वर कार्यालयात गेल्यावरही पुरेसा सन्मान मिळत नव्हता. म्हणूनच ही निवडणूक होवू घातलेली आहे. कारण असे बरेचजण आहेत की त्यांना तिथं सन्मानच मिळालेला नाही.

सन्मान....... अलिकडील काळात लोकं खाणं पिणं पाहात नाहीत. पाहतात केवळ सन्मान. जो सन्मान विदर्भ साहित्य संघाकडून मिळायला हवा. असंही बरेच सदस्य मानतात. त्यावरुन ही निवडणूक. म्हणूनच ती प्रतिष्ठेची ठरलेली आहे.

विदर्भ साहित्य संघाची निवडणूक जाहीर झाली आहे व त्या निवडणुकीला लोकं उभे राहिलेले आहेत. ते प्रश्न घेवून. पहिला मुद्दा असा की जे कार्यक्रम होतात. ज्या कार्यक्रमांपैकी आतापर्यंत एकाही कार्यक्रमाला ज्यांना सहभागी केलं गेलं नाही. त्यांना न्याय देवू. परंतु हा मुद्दा गौण आहे. कारण सध्याच्या अवस्थेत एवढे सदस्य विदर्भ साहित्य संघाचे सदस्य आहेत की प्रत्येकाला विदर्भ साहित्य संघ कार्यक्रमाला बोलवूच शकत नाही. परंतु ते स्वतः येवू शकतात विदर्भ साहित्य संघाच्या कार्यक्रमात. त्यांनाही साहित्य दृष्टीनं मनोरंजन हवं असतं. परंतु तरीही ते तिथं येत नाहीत. त्याचं कारण आहे त्यांची ओळख. ते सदस्य असतात. परंतु ओळखपत्र त्यांच्याजवळ नसल्यानं जो पहिल्यावेळेस अपमान होतो. तो अपमान लक्षात घेता पुन्हा तिथं यावंसं वाटत नाही. त्यातच असे अपमानीत झालेले सदस्य पुन्हा तिकडे कोणीही येत नाहीत.

विद्यमान अवस्थेतील मी अनुभवलेला एक प्रकार मांडतो. मीही विदर्भ साहित्य संघाच्या निवडणुकीत फॉम भरावा म्हणून दि. १६ तारखेला गेलो. तेव्हा खालच्या भागात असलेल्या गाडी स्टँडवर गाडी लावली. त्यावेळेस चौकीदाराने म्हटलं,

ओ भैया, इधर गाडी लगाने का नही।

ते त्याचं म्हणणं. त्यावर मी म्हटलं की साहेब, मी मेंबर आहे विदर्भ साहित्य संघाचा. परंतु त्यावर तो म्हणाला,

साहाब, मै मेंबर वेंबर नही जानता, आप पैसे दो। बाद मे बात करो।

ते त्याचं बोलणं, त्यावर मी म्हटलं,

अगर पैसे नही दिये तो?

ते माझं बोलणं. त्यावर तो म्हणाला,

मी गाडीच लावू देणार नाही. त्यावर मी म्हटलं,

मला फॉम घ्यायचा आहे, निवडणुकीत उभं राहायचं आहे. फॉम घ्यायला आलोय. मी पैसे देणार नाही.

मी तसं म्हणूनही तो जिद्दीवरच होता. त्यामुळंच शेवटी मी म्हटलं,

मी फॉम घेवून येतो. त्यानंतर आपणाला पैसे देतो.

तो मानला व मी वर जावून फॉम आणला. त्यानंतर त्याला म्हटलं,

मी आता फॉम आणलेला आहे. मी तुला पैसे देतो. परंतु इथं जर निवडून आलो ना. तर तुला आधी काढून टाकेल.

आज मी सन एकोणविसशे पंच्यानवचा सदस्य आहे व माझ्या एकशे सोळा पुस्तका प्रसिद्ध आहेत. ज्या आजच्या ऑनलाईन काळात माझं किंवा पुस्तकाचं नाव जरी टाकलं तरी गुगलवर उघडतात. परंतु असं मांडणं म्हणजे माझा अहंकार आहे. असे असूनही मला जर तशी वागणूक मिळत असेल साहित्य संघात तर मी का बरं उभा राहू नये निवडणुकीत? असं प्रत्येक सदस्यांसोबत घडत असेलच कोणत्या ना कोणत्या बाबतीत. जे माझ्यासोबत घडलं. मी आज निवडणुकीचा फॉम भरला नाही. पुरेसा थांबलो. कारण निवडणुकीत फॉम भरणारी मंडळी ही आपलीच आहेत. आपल्याच परीवारातील आहेत. अन् परिवारातील मंडळींचं काही थोडंसं चुकतही असेल तर त्यांना माफ करावं लागतं. असा विचार करुन. तेच मी केलं. त्यांना सुधारण्याची संधी द्यावी एकदा म्हणून. कदाचीत मी निवडणुकीत उभा तर राहू शकतो. परंतु निवडून येणार नाही, असा विचार करुन. परंतु ते बाकी लोकांनी केलंलं नाही. ते निवडणुकीत उभे राहिले. आगामी काळात मीही नक्कीच उभा राहील निवडणुकीत. सर्व सदस्यांना ओळखपत्र देण्यासाठी. जर निवडून येणाऱ्या सदस्यांनी सर्व सदस्यांना त्यांची ओळखपत्र दिली नाही तर....

फॉम कुणाकडून भरताय?

कुणाकडून म्हणजे?

शोभणेकडून की जोशींकडून.

कुणाहीकडून नाही. वैयक्तिक भरतोय.

तुम्ही काही वैयक्तिक निवडून येणार नाही.

मग भरु नको काय मी फॉम?

मी तसं म्हणत नाही. परंतु खर्च कशाला करताय उगाचाच.

का? मला निवडणुकीत उभे राहायचा अधिकार नाही का विदर्भ साहित्य संघाच्या?

नाही, मी तसं म्हणत नाही. उपाय सांगीतला. विनाकारण खर्च कशाला करताय हाच तो विचार.

का वैयक्तिक उभा राहणारा व्यक्ती निवडणुकीत निवडून येत नाही काय?

नाही येत साहेब, पक्षाचं चिन्हं हवंच.

तो तेथील कर्मचाऱ्यासोबत घडलेला संवाद. कदाचीत माझा अवतार पाहून तो कर्मचारी रास्त भावनेनं बोलला असेल. त्याला वाटलं असेल की साहेब वैयक्तिक फॉम भरीत आहेत. निवडून जर नाही आले तर पैसे उगाचच वाया जातील. साहेबांचे पैसे उगाचंच कशाला वाया जावू द्यायचे. कारण यापुर्वीच्या ज्या विदर्भ साहित्य संघाच्या निवडणुका झाल्यात. त्या निवडणुकीत मतदान करायचे बॅलेट पेपरच मतदारांपर्यंत पोहोचले नाहीत. मला तर आजपर्यंत अजुनही आले नाहीत. मी उभं राहिल्यावर असंच घडलं तर..... मी कसा निवडून येणार. हे त्याला माहीत असणार. म्हणूनच तो बोलला. तसं पाहिल्यास विदर्भ साहित्य संघांचं नाव साहित्यावरुन आहे व कार्यही साहित्याचं आहे. परंतु संधी साहित्यीकांना मिळतांना दिसत नाही. मला आजपर्यंत विदर्भ साहित्य संघात कोणत्याच स्वरुपाची संधी मिळालेली नाही. हेही इतरही बर्याच सदस्यांबरोबर घडत असेलच. महत्वाचं सांगायचं झाल्यास आज विदर्भ साहित्य संघ लहानशा रोपट्यावरुन विशाल महाकाय वृक्ष बनलेला आहे. एकशे तीन वर्षाची विदर्भ साहित्य संघाला परंपरा लाभलेली आहे. अशावेळेस विदर्भ साहित्य संघाच्या सदस्यात, ती साहित्य संस्था असून व ती साहित्याशी निगडीत असूनही ज्यांची काहीच पुस्तके प्रसिद्ध नाहीत. असेही लोकं आहेत. ते फक्त साहित्यीकरण वेगळं व राजकारण जास्त खेळत असतात. मध्यतंरीच्या काळात अखिल भारतीय साहित्य संमेलनात नाव हवं ना. मग एवढे एवढे रुपये द्या. अशी हूक उडवली होती. ज्यात ज्या लोकांनी दिले असेल. त्यांची वर्णी लागलेली असेलच. कारण बरीचशी तशाच स्वरुपाची नावं दिसतात कधीकधी पत्रिकेतून. परंतु असं जरी आजपर्यंत घडलं असेल तरी तो गतकाळ होता. भुतकाळ, भुतकाळ असतो. तो काळ परत येत नाही. परंतु आगामी काळात असं होवू नये. आगामी काळात प्रत्येक सदस्याला सन्मान मिळायलाच हवा. मग तो सदस्य नवीन असो की जुना. सदस्य हे आपल्याला चहा मागत नाहीत. पाणीही मागत नाहीत. फक्त आपलं गोड बोलणं मागतात. तोच सन्मान असतो. आपल्या विचारानं त्यांचा सन्मान करावा. जेणेकरुन त्यांनाही चांगलं वाटायला हवं. तसंच असंही वाटायला हवं की तो विदर्भ साहित्य संघाचा सदस्य बनल्यानं त्याचं सार्थक झालं. जे इतर संस्थेतून झालेलं नाही. शिवाय विशेष म्हणजे ओळखपत्र दिलीत तर फारच बरं. जेणेकरुन गाडी स्टँडवर मागितलं जाणारं गाडी स्टँडचं शुल्क तरी माफ होईल. हे तेवढंच खरं.

**– अंकुश शिंगाडे,** नागपूर ९३७३३५९४५०

**कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, छत्रपती संभाजीनगर**
**यांचे कार्यालय**
महाराष्ट्र शासन
**पदमपुरा परीसर, छत्रपती संभाजीनगर -४३१००५**
ई-मेल- aurangabad.eemahapwd.gov.in दुरध्वनी ०२४०-२३३१०२२

**सार्वजनिक बांधकाम विभाग मंत्रालय मंबई शासन शुध्दीपत्रक क्रमांक सीएटी /२०२४/प्र.क्र.१४४ /इमा-२**
**दिनांक - २८/०२/२०२४**
**ई निविदा सूचना क्रं. ४१२ सन २०२५-२६**

कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, छत्रपती संभाजीनगर ( दुरध्वनी क्रमांक ०२४०-२३३११७४) महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम यांच्या कडुन (०५) कामांकरिता योग्य त्या वर्गातील नियमित नॉदनिकृत ठेकादाराकरिता बी-१ नमुन्यातील निविदा (ऑफलाईन/ऑनलाईन) प्रणालीव्दारे मागविण्यांत येत आहे.

खालील संकेतस्थळावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.

१) http://mahapwd.gov.in
२) https://mahatenders.gov.in (सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यांत येईल)
३) कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग छत्रपती संभाजीनगर यांचे कार्यालयातील सुचना फलक

जिमाका/छ.स.न.जाहि.५५०/२०१५-२०१६

**स्वाक्षरीत/-**
**कार्यकारी अभियंता**
**सार्वजनिक बांधकाम विभाग**
**छत्रपती संभाजीनगर**

# संत ताजुद्दीन बाबांची महिमा अपरंपार

संत ताजुद्दीन बाबा हे सर्वधर्म समभावाचे प्रतिक मानल्या जाते.कारण संपूर्ण धर्माचे लोक बाबांच्या दर्शनासाठी येतात.भारत ही संतांची भूमी आहे.ही बाब संपूर्ण जग जाणतो.कारण या भुमित संत ज्ञानेश्वर,संत तुकाराम,संत नामदेव,संत ताजुद्दीन बाबा,संत गजानन महाराज,संत साईबाबा इत्यादी अनेक संतांचा जन्म महाराष्ट्रात झालेला आहे.त्यामुळेच महाराष्ट्राला संतांची भूमीचा दर्जा मिळाला आहे.भारत भुमित कोणत्या-ना-कोणत्या रूपाने प्रत्येक धर्मात संत या भुमित जन्म घेत असतात व सर्वच धर्माच्या संस्कृतीचे जतन होत असते.आज संपूर्ण जग जाणते की भारत हे शांततेचे प्रतिक आहे.याचे मुख्य कारण म्हणजे या भुमित अनेक धर्म जन्माला आलेत त्यामुळेच अनेक संस्कृती दिसून येतात आणि मुख्यत्वे करून एकोप्याने राहतात हाच संत भुमिचा खरा गोडवा आहे. नागपूरातील संत ताजुद्दीन बाबा यांची अपार महिमा आपल्याला पहायला मिळते आणि जगजाहीर आहे.ताजुद्दीन बाबांचा जन्म २७ जानेवारी १८६१ ला नागपूर शहरापासून १५ किलोमीटरवर असलेल्या कामठी या गावी झाला.बाबा एकवर्षाचे असतांनाच त्यांच्या वडिलांचा देहान्त झाला.यानंतर त्यांच्या ९ वर्षाच्या वयातच आईचा सुध्दा स्वर्गवास झाला.यानंतर त्यांचे पालनपोषण त्यांच्या आजीने करून त्यांना लहाण्याचे मोठे केले. ताजुद्दीन कामठीतील मदरशांमध्ये शिकत होते.कामठीतील मदरशांमध्ये अचानक हजरत अब्दुल्ला शाह नावाचे फकीर आले आणि त्यांची नजर (बालक) बाबा ताजुद्दीनवर पडली.त्यावेळेस त्या फकीराने शिक्षकाला विचारले तुम इनको क्या पढाते हो शिक्षक स्तब्ध झाले आणि फकीरच म्हणाले यह बालक (बाबा ताजुद्दीन) जन्मसेही सब कुछ सीखकर आया है.इतके बोलुन फकीर तेथुन निघुन गेले.ताजुद्दीन बाबांना त्यांच्या मामांनी १८८१ मध्ये म्हणजे वयाच्या २० व्या वर्षी नागपूरची रेजिमेंट नं. १३ मध्ये भर्ती केले.तीन वर्षांनंतर त्यांना मद्रासमधील सागरला पाठविण्यात आले.मद्रासी पलटनमध्ये अचानक विराण जागेवर संत हजरत दाऊद यांच्याशी भेट झाली आणि संपूर्ण रात्र सोबत भजन-कव्वालीमध्ये तल्लीन झाले.ताजुद्दीन बाबा स्वतः देवांच्या आठवणीत डुबुन रहायचे. असे सांगितले जाते की बाबांची ड्युटी शस्त्रभंडार देखभाल करण्यावर होती. बाबा आपला पहारा चोख देत होते, अशावेळी रात्री २ वाजता अचानक इंग्रज कैप्टन त्या जागेची पाहणी करायला आला. पाहणी झाल्यानंतर कैप्टन वापस जायला लागला. काही अंतरावर जात नाही तर त्याला जो शिपाई पहारा (ताजुद्दीन) देत होता तोच शिपाई पुन्हा दिसला.कैप्टनला गुस्सा आला पुन्हा वापस पहिल्या जागेवर गेला तर तीथे पहाले तर तो शिपाई (ताजुद्दीन)आपल्या जागेवरच होता.यानंतर इंग्रज ऑफिसरने बाबांना पेशीसाठी बोलावले व विचारले की आम्ही तुम्हाला दोन-दोन ठीकाणी पहाले. तुम्ही देवाचे अवतार आहात का? यावर बाबांना घुस्सा आला.परंतु इंग्रज समजले हा शिपाई साधारण व्यक्ती नसून संत महात्मा आहे.हा त्यांचा पहिला चमत्कार दिसून आला.कालांतराने त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला.बाबांची वेगवेगळी हरकते पाहून त्यांच्या आजीने ताजुद्दीनला पुन्हा कामठीला आणले व अनेक डॉक्टरांना दाखविले.परंतु त्यांनी आत्मा व परमात्माची एकरूपता अवगत केल्याचे दिसून आले. काही लोक त्यांना पागल समजायला लागले.परंतु हळूहळू त्यांच्या हातुन अनेक चमत्कार दिसायला लागले.पीडीत लोक आपले दुःख-वेदना बाबांना सांगायला लागले व त्यांच्या नेत्रदृष्टीने बरेही व्हायला लागले.बाबांचे चमत्कार दुर-दुर पर्यंत पसरायला लागले.परंतु काही लोक आपल्या चमत्काराचा चुकीचा फायदा घेत असल्याचे लक्षात आले.तेव्हा त्यांनी पागल असल्याचे सोंग करने सुरू केले व लोक त्यांच्या हरकतींना त्रासुन पोलिस कंप्लेंट केली व २६ ऑगस्ट १८९२ ला कामठीच्या कैन्टोनमेन्ट व जिल्हा मॅजेस्टेटने पागलखान्यात पाठविले. पागलखाण्यात लॉकपह्ध्ये बंद केल्यानंतरही लोकांना बाबा नागपूरच्या अनेक भागात दिसत होते.हा चमत्कार सर्वच मोठ-मोठ्या ऑफिसरच्या लक्षात आला. असे अनेक चमत्कार लोकांना दिसायला लागले व बाबा ताजुद्दीन संत झाले.२१ सप्टेंबर १९०८ ला नागपूरचे महाराजा श्रीमंत राजा बहादुर राधोजीराव भोसले यांच्या प्रयत्नाने बाबांना पागलखान्यातुन मुक्त केले राजाने आपल्या महालात आणले व राजांनी ताजुद्दीन बाबांची सेवा केली.संत ताजुद्दीन बाबा हिंदू-मुस्लिमांचे प्रेरणादायी प्रतिक होते.बाबांची तब्बेत काही दिवसांत खालावली व १७ ऑगस्ट १९२५ ला श्रीमंत भोसले यांच्या महालात त्यांची प्राणज्योत मालवली. त्यामुळे नाम समाधी म्हणून सक्करदरा येथील श्रीमंत भोसले यांच्या महालात त्यांची समाधी बांधण्यात आली यालाच लहान ताजबाग म्हणतात.इथे हिंदू प्रथेनुसार मोठ्या प्रमाणात आजही पुजा-अर्चना केली जाते व अंतिम संस्कार लहान ताजबागपासुन एक किलोमीटर अंतरावर असलेल्या ताजबाग येथे करण्यात आला याला मोठा ताजबाग म्हणतात.इथे मुस्लिम पध्दतीने पुजाअर्चना केली जाते.याप्रमाणे मोठा ताजबाग व लहान ताजबाग हे दोन्ही पवित्र स्थान भारतभर प्रसिद्ध आहे या ठीकाणी दोन्ही धर्माचे लोक एकत्र येतात ही नागपूरसाठी गौरवास्पद बाब आहे.संत ताजुद्दीन बाबांनी आपले पाय ज्या-ज्या ठिकाणी रोवले त्या-त्या ठिकाणी दर्गा आपल्याला पहायला मिळते व बाबांचे दर्शन होते.बाबाचे अनेक प्रसिद्ध ठिकाण आहेत यात मोठा ताजबाग, लहान ताजबाग, वाकी, पागलखाना हे प्रसिद्ध ठिकाण आजही प्रसिद्ध आहे.बाबाच्या जयंती निमित्त शहरात विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन मोठ्या प्रमाणात करण्यात येते. त्यामुळे संपूर्ण भक्तांना विनंती आहे की, वाढते हवामानातील बदल व प्रदुषणाचा धोका पहाता बाबांच्या जयंतीच्या निमित्ताने आपापल्या पद्धतीने संपूर्ण धर्माच्या भक्तांनी वृक्षारोपण करावे.यामुळे आपल्याला शुद्ध हवा मिळेल व ऑक्सिजनची मात्रा वाढेल यामुळे आल्हाददायक वातावरण निर्माण होईल.अशा पध्दतीने वृक्षलागवड झाली तर प्रत्येक झाडाच्या पानात, फुलात,फळात व जळामुळात आपल्याला बाबांचे दर्शन अवश्य होईल व ही आठवण मनुष्याच्या हृदयात अनंत काळापर्यंत राहील.कारण बाबांचा सहवास नेहमीच निसर्गाच्या सान्निध्यात रहायचा त्यामुळे वृक्षलागवड अती आवश्यक आहे.संत ताजुद्दीन बाबांना कोटी कोटी प्रणाम.

**– रमेश कृष्णराव लांजेवार**
( स्वतंत्र पत्रकार ), मो. नं.९९२१६९०७७९ नागपूर

# भारतीय जनता पार्टी प्रदेश कार्यालयात उत्साहात ध्वजारोहण; ७७ व्या प्रजासत्ताक दिनाचे जल्लोषात स्वागत

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या ७७ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून आज मुंबईतील भारतीय जनता पार्टीच्या प्रदेश कार्यालयात अत्यंत उत्साहात आणि देशप्रेमाच्या वातावरणात ध्वजारोहण सोहळा संपन्न झाला. भाजपा प्रदेशाध्यक्ष श्री. रविंद्र चव्हाण यांच्या हस्ते मुख्य ध्वजारोहण करण्यात आले.

**भारतमातेचे पूजन आणि अभिवादन :** कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीताने आणि 'भारत माता की जय'च्या घोषणांनी झाली. ध्वजारोहणानंतर श्री. रविंद्र चव्हाण यांनी भारतमातेच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी उपस्थितांनी संविधानातील मूल्यांचे जतन करण्याची आणि राष्ट्र उभारणीत सक्रिय योगदान देण्याची शपथ घेतली.

**दिग्गज नेत्यांची उपस्थिती :** या सोहळ्याला भाजपचे अनेक ज्येष्ठ नेते आणि पदाधिकारी उपस्थित होते. यामध्ये प्रामुख्याने खालील मान्यवरांचा समावेश होता:



**आमदार:** श्रीकांत भारतीय, अभिमन्यू पवार, प्रवीण पोटे.

**महिला आघाडी:** महिला मोर्चा प्रदेशाध्यक्ष आ. चित्रा वाघ.

**प्रवक्ते:** प्रदेश मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये, प्रदेश सह-मुख्यप्रवक्ता विश्वास पाठक आणि प्रदेश प्रवक्ता मा. अतुल शाह.

**पदाधिकारी:** दक्षिण मुंबई जिल्हाध्यक्षा शलाका साळवी, प्रदेश मुख्यालय प्रभारी रवींद्र अनासपुरे, ज्येष्ठ नेते बसवराज पाटील.

**इतर मान्यवर:** हरिता अग्रवाल, कमलाकर दळवी आणि प्रदेश कार्यालय सहसचिव भरत राऊत यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

**प्रदेशाध्यक्षांचा संदेश :** यावेळी बोलताना श्री. रविंद्र चव्हाण यांनी सर्व नागरिकांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. भारताला आत्मनिर्भर आणि विकसित राष्ट्र बनवण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देश वेगाने प्रगती करत असून, प्रत्येक कार्यकर्त्याने शेवटच्या घटकापर्यंत पोहचून देशसेवा करावी, असे आवाहन त्यांनी केले.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांना मिठाऊ वाटप करण्यात आले. मुंबईतील नरीमन पॉईंट येथील प्रदेश कार्यालयाचा परिसर यावेळी तिरंगी सजावटीने उजळून निघाला होता.

# मंत्री पंकजा मुंडे यांच्या हस्ते विविध विकासकामांचा आणि नदी स्वच्छता अभियानाचा शुभारंभ

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/ प्रतिनिधी/** भारतीय प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजा गोपीनाथ मुंडे यांनी आज जालना शहराला भेट दिली. या दौऱ्यात त्यांच्या हस्ते जालना महानगरपालिकेच्या विविध महत्त्वपूर्ण विकासकामांचे उद्घाटन आणि सीना-कुंडलिका नदी स्वच्छता अभियानाचा शानदार शुभारंभ करण्यात आला.

**१. मोकाट श्वानांसाठी अत्याधुनिक 'श्वान केंद्र' :** शहरातील मोकाट कुत्र्यांच्या वाढत्या संख्येवर नियंत्रण मिळवण्यासाठी महानगरपालिकामार्फत 'सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान' अंतर्गत विशेष प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. भोकरदन नाका येथे उभारण्यात आलेल्या या श्वान केंद्राचे उद्घाटन पालकमंत्र्यांच्या हस्ते झाले.

**उद्देश:** मोकाट श्वानांचे निर्बीजीकरण करणे आणि त्यांची संख्या नियंत्रित करणे. **सुविधा:** श्वानांना सुरक्षित ठेवण्यासाठी येथे निवारा केंद्राची (डहशश्रींशी केश) व्यवस्था करण्यात आली आहे. **२. छत्रपती संभाजी उद्यान सुशोभीकरण :** जालना शहराच्या सौंदर्यात



भर घालणाऱ्या छत्रपती संभाजी उद्यानाच्या प्रवेशद्वाराच्या सुशोभीकरणाच्या कामाचा शुभारंभही यावेळी करण्यात आला. यामुळे शहराच्या मुख्य भागाला एक नवा आणि आकर्षक चेहरा मिळणार आहे.

**३. सीना-कुंडलिका नदी पुनर्जीवन व स्वच्छता अभियान :** जालन्याची जीवनवाहिनी समजल्या जाणाऱ्या सीना आणि कुंडलिका नद्यांच्या पात्रातील प्रदूषण रोखण्यासाठी 'समस्त महाजन ट्रस्ट'च्या सहकार्याने स्वच्छता अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे. या नदी पात्राचे पुनर्जीवन आणि स्वच्छता कामाचा श्रीगणेशा पालकमंत्री मुंडे यांच्या हस्ते करण्यात आला. पर्यावरणाचे रक्षण आणि जलस्रोतांचे संवर्धन करण्याच्या दृष्टीने हे पाऊल अत्यंत महत्त्वाचे मानले जात आहे. **उपस्थित मान्यवर :** या कार्यक्रमाला पालकमंत्र्यांसोबत राजकीय आणि प्रशासकीय क्षेत्रातील प्रमुख मंडळी उपस्थित होती, ज्यात खालील मान्यवरांचा समावेश होता: आमदार: अर्जुन खोतकर, नारायण कुचे प्रशासन: जिल्हाधिकारी अशिमा मित्तल, मनपा अतिरिक्त आयुक्त अर्जुन गिराम, उपायुक्त नंदा गायकवाड अभियंता: मनपा शहर अभियंता सय्यद सऊद या प्रसंगी महानगरपालिकेचे अधिकारी, कर्मचारी आणि मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. या विकासकामांमुळे जालना शहराच्या पायाभूत सुविधांमध्ये मोठी सुधारणा होईल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

## संक्षिप्त

# टाकळी येथील शिवेश्वर विद्यालयात ७७ वा प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा



**आत्ताच एक्सप्रेस**

**टाकळी (कन्नड)/ प्रतिनिधी/** कन्नड तालुक्यातील धारेश्वर शिक्षण संस्था, छत्रपती संभाजीनगर संचलित, शिवेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय टाकळी अंतुर येथे भारतीय ७७ वा प्रजासत्ताक दिन अत्यंत उत्साही वातावरणात साजरा करण्यात आला. धारेश्वर शिक्षण संस्थेचे प्राचार्य आणि माजी जिल्हा परिषद सदस्य संदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रमाची सुरुवात विद्यालयाचे प्राचार्य संदीप पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करून करण्यात आली. यावेळी मैदानाचे अतिशय सुंदर सुशोभीकरण करण्यात आले होते. लेझीम पथक आणि विविध महापुरुषांच्या वेशभूषेत असलेल्या विद्यार्थ्यांची गावातून प्रभात फेरी काढण्यात आली, ज्याने ग्रामस्थांचे लक्ष वेधून घेतले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे उपमुख्याध्यापक अशोक सपाटे होते. अध्यक्ष महोदय आणि गावातील प्रतिष्ठित नागरिकांच्या हस्ते राष्ट्रपिता महात्मा गांधी व भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करण्यात आले.

ध्वजारोहणानंतर संगीताच्या तालावर विद्यार्थ्यांनी सामूहिक कवायत (बैठे आणि उभे प्रकार) सादर केली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणातून आणि देशभक्तीपर गीतांतून प्रजासत्ताक दिनाचे महत्त्व विशद केले. याप्रसंगी विविध क्षेत्रांत उच्च पदांवर कार्यरत असलेल्या माजी विद्यार्थ्यांचा शाळेच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन विशेष सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विठ्ठल सोळुंके यांनी केले, तर अरविंद जंजाळ सर यांनी उपस्थितांचे आभार मानले. या सोहळ्यासाठी शाळेतील सर्व विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, माजी विद्यार्थी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# छत्रपती संभाजीनगर जिल्हाधिकारी कार्यालयात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी/** भारतीय प्रजासत्ताक दिनाचा ७७ वा वर्धापन दिन आज छत्रपती संभाजीनगर जिल्हाधिकारी कार्यालयात अत्यंत उत्साहात आणि देशप्रेमाच्या वातावरणात साजरा करण्यात आला. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या मुख्य प्रांगणात आयोजित करण्यात आलेल्या दिमाखदार सोहळ्यात जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.



**मुख्य सोहळ्याचे स्वरूप :** सकाळी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात हा मुख्य शासकीय ध्वजारोहण सोहळा पार पडला. राष्ट्रगीत आणि देशभक्तीपर गीतांच्या सुरावटीत तिरंगा फडकावण्यात आला. यावेळी पोलीस दलाच्या वतीने राष्ट्रध्वजाला मानवंदना देण्यात आली. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी उपस्थित सर्व अधिकारी, कर्मचारी आणि नागरिकांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

**मान्यवरांची उपस्थिती :** या सोहळ्याला प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची प्रमुख उपस्थिती होती. यामध्ये प्रामुख्याने:

अपर जिल्हाधिकारी: संभाजीराव अडकुणे, निवासी उपजिल्हाधिकारी: जनार्दन विधाते, उपजिल्हाधिकारी: संगिता राठोड, एकनाथ बंगाळे, प्रविण फुलारीा, जिल्हा नियोजन अधिकारी: भारत वायाळ, यांच्यासह जिल्हाधिकारी कार्यालयातील विविध विभागांचे विभागप्रमुख, अधिकारी आणि मोठ्या संख्येने कर्मचारी उपस्थित होते.

**प्रशासकीय संकल्पाचा पुनरुच्चार :** ध्वजारोहणानंतर उपस्थित अधिकाऱ्यांनी राष्ट्रहित आणि लोकशाहीच्या मूल्यांची जपणूक करण्याचा संकल्प केला. जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी आणि शासकीय योजना तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी कटिबद्ध राहण्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. कार्यक्रमाच्या शेवटी मिठाई वाटप करून आनंदाने या राष्ट्रीय उत्सवाची सांगता झाली.

# घानेगाव तांडा आश्रम शाळेत ७७ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**आत्ताच एक्सप्रेस**

**सोयगाव (प्रतिनिधी)** सोयगाव तालुक्यातील घानेगाव तांडा येथील आश्रम शाळेत ७७ वा प्रजासत्ताक दिन अत्यंत उत्साहपूर्ण, शिस्तबद्ध आणि देशभक्तीच्या वातावरणात साजरा करण्यात आला. या निमित्ताने शालेय परिसर भारत माता की जय आणि देशभक्तीपर घोषणांनी दुमदुमून गेला होता.

कार्यक्रमाची सुरुवात प्रभात फेरीने झाली. गावातील मुख्य रस्त्यावरून काढण्यात आलेल्या या फेरीद्वारे विद्यार्थ्यांनी मतदान जनजागृती आणि देशभक्तीचा संदेश दिला. त्यानंतर माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक संजय पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी शिक्षक सुनील कवीश्वर यांनी उपस्थित सर्वांना मतदान जनजागृती, कॉपीमुक्त अभियान आणि असाक्षर मुक्त गाव करण्याची शपथ दिली.

विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या लेझिम पथक आणि संगीत कवायतींनी उपस्थितांची मने जिंकली. तसेच देशभक्तीपर गीतांवरील समूह नृत्यांनी कार्यक्रमात रंगत आणली. या सोहळ्याला गावातील प्रतिष्ठित नागरिक, पालक, शिक्षक आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनील कवीश्वर यांनी केले. या सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी देवचंद बागुल, मनोज पाटील, प्रवीण पवार, सलीम तडवी, शंकर पायघन आणि आकाश पेंढारे यांनी विशेष परिश्रम घेतले. मुख्याध्यापक संजय पाटील व दिवाकर लवांडे यांच्या मार्गदर्शनाखाली हा सोहळा संपन्न झाला.

**कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, छत्रपती संभाजीनगर**

यांचे कार्यालय

महाराष्ट्र शासन

पदमपुरा परीसर, छत्रपती संभाजीनगर -४३१००५

ई-मेल- aurangabad.eemahapwd.gov.in दुरध्वनी-०२४०-२३३१०२२

**सार्वजनिक बांधकाम विभाग मंत्रालय मंबई शासन शुध्दीपत्रक क्रमांक सीएटी /२०२४/प्र.क्र.१४४ /इमा-२ दिनांक - २८/०२/२०२४**

**ई निविदा सूचना क्रं. ४२५ सन २०२५-२६**

कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, छत्रपती संभाजीनगर ( दुरध्वनी क्रमांक ०२४०-२३३११७४) महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम यांच्या कडुन (०२) कामांकरिता योग्य त्या वर्गातील नियमित नोंदनिकृत ठेकादाराकरिता बी-१ नमुन्यातील निविदा (ऑफलाईन / ऑनलाईन) प्रणालीव्दारे मागविण्यांत येत आहे.

खालील संकेतस्थळावर ई-निविदाची सर्व माहिती उपलब्ध आहे.

१) http://mahapwd.gov.in
२) https://mahatenders.gov.in (सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेबसाईटवरती कळविण्यांत येईल)
३) कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग छत्रपती संभाजीनगर यांचे कार्यालयातील सुचना फलक

**जिमाका/छ.स.न.जाहि/५६३/२०२५-२०२६**

स्वाक्षरीत/-
कार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम विभाग
छत्रपती संभाजीनगर

# छत्रपती संभाजीनगरमध्ये ७७ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा; पालकमंत्र्यांच्या हस्ते ध्वजवंदन

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी/** देशाच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनाचा जिल्हास्तरीय मुख्य शासकीय सोहळा आज पोलीस आयुक्तालयाच्या देवगिरी मैदानावर मोठ्या उत्साहात संपन्न झाला. राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री संजय शिरसाट यांच्या हस्ते मुख्य ध्वजवंदन करण्यात आले.



**शानदार संचलन आणि राष्ट्रभक्तीचा जागर :** ध्वजवंदनानंतर पोलीस दल आणि इतर पथकांकडून शानदार संचलन (परेड) करण्यात आले. या संचलनाने उपस्थितांच्या मनात देशभक्तीची भावना जागृत केली. पालकमंत्र्यांनी परेडचे निरीक्षण करून उपस्थितांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी राष्ट्रगीत आणि राज्यगीताच्या सुरांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता.

**संविधानाची महती घरोघरी पोहोचवूया: पालकमंत्री :** आपल्या भाषणात पालकमंत्री संजय शिरसाट यांनी लोकशाही आणि संविधानाचे महत्त्व अधोरेखित केले. ते म्हणाले: विविधतेने नटलेल्या आपल्या देशाला एकतेच्या सूत्रात गुंफणाऱ्या संविधानाची महती आपण घरोघरी पोहोचवूया. आपली लोकशाही आणि प्रजासत्ताक अधिक बळकट करण्यासाठी सर्वांनी मिळून प्रयत्न करणे काळाची गरज आहे.

**कर्तव्यवान पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचा गौरव :** या विशेष प्रसंगी उत्कृष्ट सेवेबद्दल राष्ट्रपती पदक आणि पोलीस महासंचालक पदक विजेत्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा पालकमंत्र्यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

**प्रमुख सन्मानार्थी: राष्ट्रपती पदक:** अपर पोलीस अधीक्षक किरण जितेंद्रसिंग पाटील, सहायक पोलीस उपनिरीक्षक अफजलखान पठाण.

**केंद्रीय गृहमंत्री दक्षता पदक (२०२५):** पोलीस उपआयुक्त श्रीमती शर्मिष्ठा घारगे-वालावलकर.

**पोलीस महासंचालक सन्मानचिन्ह (२०२५):** पोलीस निरीक्षक गीता बागवडे, शेख हबीब खान, दीपक परदेशी, इसाक पठाण, संजय जोगदंडे यांच्यासह अनेक पोलीस अंमलदारांचा समावेश होता.

**मान्यवरांची उपस्थिती :** या सोहळ्याला विधानपरिषदेचे सदस्य आ. संजय केणेकर, माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, माजी खासदार चंद्रकांत खैरे, विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर, विशेष पोलीस महानिरीक्षक विरेंद्र मिश्र, मनपा आयुक्त जी. श्रीकांत, जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित, पोलीस आयुक्त प्रवीण पवार, पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड यांच्यासह स्वातंत्र्यसैनिक, नागरिक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे नेटके सूत्रसंचालन प्रविणा कन्नडकर यांनी केले. ध्वजवंदन सोहळ्यानंतर पालकमंत्र्यांनी उपस्थित स्वातंत्र्यसैनिक आणि नागरिकांची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांना शुभेच्छा दिल्या.

# छत्रपती शाहू महाराज महाविद्यालयात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी/** सिल्लोड शिक्षण संस्था संचलित, छत्रपती शाहू महाराज कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय (एन-११, हडको) येथे भारतीय प्रजासत्ताक दिन अत्यंत उत्साही आणि प्रेरणादायी वातावरणात साजरा करण्यात आला.



**ध्वजारोहण आणि अभिवादन :** कार्यक्रमाची सुरुवात संस्थेचे सचिव डॉ. राहुलजी म्हस्के यांच्या हस्ते ध्वजारोहणाने झाली. यावेळी राष्ट्रगीत व ध्वजगीताच्या सुरावटीत तिरंग्याला मानवंदना देण्यात आली. ध्वजारोहणानंतर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शितल गायकवाड यांनी भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

**उपस्थित मान्यवर व कर्मचारी :** या सोहळ्याला महाविद्यालयातील प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. यामध्ये प्रामुख्याने: डॉ. अश्विनी सोनोने, प्रा. योगेश नरवडे, प्रा. मनोज जाधव, प्रा. गोरखनाथ शेळके, प्रा. डॉ. कल्पना काळे, डॉ. रोहिणी भाग्यवंत, प्रा. महानंदा सुळे, प्रा. क्षितीजा लांडगे, प्रा. अनिल खंदारे यांचा समावेश होता. तसेच शिक्षकेतर कर्मचारी पूजा पगारे आणि मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमात सहभाग नोंदवला.

देशाप्रती निष्ठा आणि संविधानाचा आदर राखण्याच्या संकल्पाने या कार्यक्रमाची सांगता झाली.

# कातपूर ग्रामपंचायत कार्यालयात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा; लोकशाही बळकट करण्याचा ग्रामस्थांचा संकल्प

**आत्ताच एक्सप्रेस**

**पिंपळवाडी/प्रतिनिधी. हारुन शेख/** पैठण तालुक्यातील कातपूर ग्रामपंचायत येथे भारतीय प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात आणि राष्ट्रभक्तीच्या वातावरणात साजरा करण्यात आला. २६ जानेवारी निमित्त आयोजित या सोहळ्यात ग्रामपंचायत कार्यालयाच्या प्रांगणात ध्वजारोहण करून भारतीय संविधान आणि राष्ट्रध्वजाला मानवंदना देण्यात आली.



**महापुरुषांना अभिवादन आणि प्रतिमा पूजन :** कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रमाता, राजमाता छत्रपती शिवाजी महाराज, भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. कातपूरच्या सरपंच सविता धनंजय मोरे आणि उपसरपंच माया विजय खडसन यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून महापुरुषांना अभिवादन करण्यात आले.

**मान्यवरांची उपस्थिती :** या ध्वजारोहण प्रसंगी गावातील विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि प्रशासकीय कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यात प्रामुख्याने:

**तंटामुक्ती अध्यक्ष:** रामजी मोरे

**ग्रामपंचायत सदस्य:** गंगाधर म्हस्के, राजु सोनवणे, अविनाश मिसाळ

**प्रशासकीय कर्मचारी:** बाबासाहेब रोडी, कैलास डांगे, राहुल लाड, कृष्णा दहीहंडे

**आरोग्य विभाग:** आरोग्य सेवक सचिन बल्लाळ, आरोग्य सेविका व आशा स्वयंसेविका

**शिक्षण विभाग:** जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक वृंद आणि अंगणवाडी सेविका

**संविधानाप्रती निष्ठा आणि संकल्प :** ध्वजारोहणानंतर उपस्थितांना संबोधित करताना सरपंच सविता मोरे यांनी प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. भारताचे संविधान हे आपल्या लोकशाहीचा आधारस्तंभ आहे. संविधानातील मूल्यांवर निष्ठा ठेवून आपण सर्वांनी गावाच्या आणि देशाच्या विकासासाठी योगदान दिले पाहिजे, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी उपस्थित सर्व गावकऱ्यांनी लोकशाही अधिक बळकट करण्याचा आणि संविधानाचा आदर करण्याचा सामूहिक संकल्प केला. या सोहळ्यासाठी कातपूर गावातील नागरिक, तरुण मंडळी आणि शालेय विद्यार्थ्यांनी मोठी गर्दी केली होती. वंदे मातरम् आणि भारत माता की जय अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता.

# भक्ती आणि शक्तीचा संगम: श्री क्षेत्र भगवानगडावर अध्यात्म अन् शैक्षणिक क्रांतीचे पर्व!

**आत्ताच एक्सप्रेस**

**पाथर्डी/प्रतिनिधी/** राष्ट्रसंत भगवानबाबांच्या पदस्पर्शाने पुनीत झालेल्या आणि लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री क्षेत्र भगवानगड येथे सध्या भक्ती आणि प्रगतीचा सुवर्णसंगम पाहायला मिळत आहे. नुकतीच या पवित्र गडावर विशेष भेट देऊन ऐश्वर्यसंपन्न संत भगवानबाबा आणि संत भीमसिंह महाराज यांच्या समाधीचे मनोभावे दर्शन घेण्यात आले. यावेळी गडाचे महंत न्यायाचार्य ह.भ.प. डॉ. नामदेव महाराज शास्त्री यांच्याशी झालेल्या प्रदीर्घ चर्चेतून गडाच्या भविष्यातील भव्य दिव्य रूपाची प्रचिती आली.

**अध्यात्मिक आणि शैक्षणिक क्रांतीचे केंद्र :** केवळ दर्शन घेऊन न थांबता, नामदेव महाराज शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली गडावर सुरू असलेल्या विकासकामांची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. सध्या गडावर संत ज्ञानेश्वर माऊलींच्या भव्य मंदिराचे निर्माण कार्य अत्यंत वेगाने सुरू आहे. हे मंदिर केवळ दगड-विटांचे बांधकाम नसून, ते येणाऱ्या पिढ्यांसाठी भारतीय संस्कृतीचा आणि वारकरी संप्रदायाचा देदिप्यमान वारसा ठरणार आहे.

**केवळ मंदिरच नाही, तर उद्याचे भविष्य! :** गडावर केवळ अध्यात्मिकच नव्हे, तर शैक्षणिक संकुलाच्या उभारणीचेही भव्य कार्य हाती घेण्यात आले आहे. धर्माच्या अधिष्ठानावर आधुनिक शिक्षण ही संकल्पना शास्त्री महाराजांनी मांडली असून, त्याद्वारे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाच्या सोयीसुविधा उपलब्ध करून देण्याचा मानस आहे.

भगवानगडाची परंपरा ही समाजप्रबोधनाची आहे. माऊलींचे मंदिर आणि हे शैक्षणिक संकुल येणाऱ्या काळात लाखो तरुणांच्या जीवनाला नवी दिशा देईल, असा विश्वास नामदेव महाराज शास्त्री यांनी चर्चेदरम्यान व्यक्त केला.

# विक्रमी राष्ट्रभक्ती! पैठण तालुक्यातील १०,८८० विद्यार्थ्यांचा एकाच वेळी 'महासराव'; गिनीज बुकमध्ये होणार नोंद

**आत्ताच एक्सप्रेस**

**पैठण (प्रतिनिधी/बबन उदावंत)** भारतीय प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात राष्ट्रभक्तीचा महाकुंभ भरल्याचे पाहायला मिळाले. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या 'संस्कार दशसूत्रीचे, रंग राष्ट्रभक्तीचे' या उपक्रमांतर्गत पैठण तालुक्यातील १०,८८० विद्यार्थ्यांनी एकाच वेळी राष्ट्रगीत, राज्यगीत आणि संगीत कवायतीचे सादरीकरण करून एक नवा इतिहास रचला आहे.

**जिल्ह्यात सव्वा लाख विद्यार्थ्यांचा सहभाग :** जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या कल्पकतेतून आणि मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित, प्राथमिक शिक्षणाधिकारी जयश्री चव्हाण, माध्यमिक शिक्षणाधिकारी अश्विनी लाटकर यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हाभरात हा उपक्रम राबवण्यात आला. संपूर्ण जिल्ह्यात तब्बल १ लाख २५ हजार विद्यार्थी या उपक्रमात सहभागी झाले होते. या ऐतिहासिक सोहळ्याची नोंद 'गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड' मध्ये होणार असल्याने जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

**पैठण तालुक्यातील ५ केंद्रांवर उत्साह :** पैठण तालुक्यात ५ मुख्य केंद्रांवर हा कार्यक्रम अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने पार पडला. यात एकूण १०,८८० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

काय घडले?: विद्यार्थ्यांनी एकाच तालावर संगीत कवायतीचे प्रात्यक्षिक केले, ज्याने उपस्थितांच्या डोळ्यांचे पारणे फेडले.

मुख्य उद्देश: विद्यार्थ्यांमध्ये संस्कारासोबतच राष्ट्रभक्तीची भावना रुजवण्यासाठी 'संस्कारातून राष्ट्रभक्तीकडे' हे ब्रीद समोर ठेवून हा सोहळा आयोजित करण्यात आला होता.

**प्रशासकीय यंत्रणेची उपस्थिती :** या सोहळ्याला नायब तहसीलदार राहुल बनसोडे, गटविकास अधिकारी मनोरमा गायकवाड, सहायक गटविकास अधिकारी राजेश कांबळे, शिक्षण विस्तार अधिकारी रंगनाथ आढाव, कार्यालयीन अधीक्षक सतीश आखेगावकर यांच्यासह तालुक्यातील अनेक मान्यवर उपस्थित होते. तसेच तालुक्यातील केंद्र प्रमुख, मुख्याध्यापक आणि क्रीडा समन्वयक यांनी या उपक्रमाच्या नियोजनात महत्त्वाची भूमिका बजावली.

**यांचे लाभले विशेष सहकार्य :** कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी भूषण कावसानकर, नगर परिषद पैठण, मौलाना आझाद नागरी पतसंस्था, नगरसेवक रफिक कादरी, इम्रान पठाण, गौरव आठवले, राजकुमार रोहरा (रविराज एजन्सी), राम आहुजा (सावन कृपाल रुहानी मिशन) आणि सरपंच अशोक धर्मे यांचे विशेष सहकार्य लाभले.

## संक्षिप्त

### जालना जिल्हा व सत्र न्यायालयात उत्साहात ध्वजारोहण; भारतीय प्रजासत्ताक दिन साजरा

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना /प्रतिनिधी**/भारतीय प्रजासत्ताक दिनाचा ७७ वा वर्धापन दिन आज जालना जिल्ह्यात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने जालना जिल्हा व सत्र न्यायालय तसेच तालुका दिवाणी व फौजदारी न्यायालयात अत्यंत दिमाखदार सोहळ्यात ध्वजारोहण समारंभ पार पडला.

मुख्य शासकीय सोहळ्याच्या अनुषंगाने, जालना जिल्हा व सत्र न्यायालयात प्रभारी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्रीमती एन. एस. शेख यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. राष्ट्रगीताच्या सुरांमध्ये तिरंगा फडकवून संविधानाप्रती आदर व्यक्त करण्यात आला.तत्पूर्वी, जालना तालुका दिवाणी व फौजदारी न्यायालयाच्या प्रांगणात वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायाधीश श्रीमती ए. पी. दिवाण यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न झाले.या मंगलप्रसंगी जिल्हा व सत्र न्यायाधीश आर. बी. पारवेकर, तदर्थ जिल्हा न्यायाधीश ढेपे यांच्यासह जिल्ह्यातील सर्व न्यायिक अधिकारी उपस्थित होते. न्यायव्यवस्थेतील सर्व स्तरांवरील कर्मचारी आणि वकील वर्गाने या सोहळ्याला मोठी हजेरी लावली होती.जिल्हा वकील संघाचे पदाधिकारी आणि सदस्यांनी या कार्यक्रमात उत्साहाने सहभाग घेतला. यामध्ये प्रामुख्याने अध्यक्ष: अनिरुद्ध घुले,उपाध्यक्ष एम. बी. आटोळे,सचिव अभिषेक सतकर,सरकारी अभियोक्ता बाबासाहेब इंगळे (जिल्हा सरकारी अभियोक्ता),जयश्री बोराडे (सहाय्यक जिल्हा सरकारी अभियोक्ता)याशिवाय ड. वाल्मिक घुगे, ड. भारत खांडेकर, ड. अशोक मते, अरविंद मुरमे, विनायकराव चिटणीस, सत्यकुमार करंडे, संदीप गवळी,राहुल चव्हाण,लक्ष्मण उढाण,जी. एन. ढवळे यांसह जिल्हा वकील संघाचे अनेक सभासद आणि न्यायालयीन कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.समारंभाच्या शेवटी उपस्थितांनी एकमेकांना प्रजासत्ताक दिनाच्या शुभेच्छा दिल्या. संपूर्ण परिसर देशभक्तीपर घोषणांनी आणि उत्साहाने भारावून गेला होता.

### जनविकास शिक्षण संस्थेत प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा
### राजाभाऊ देशमुख यांच्या हस्ते ध्वजारोहण

**आत्ताच एक्सप्रेस**

**भोकरदन /सोपान प्र. सपकाळ**/ देशाच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनाचा उत्साह सर्वत्र पाहायला मिळत असून, भोकरदन येथील



जनविकास शिक्षण संस्थेत प्रजासत्ताक दिन अत्यंत उत्साहात आणि देशप्रेमपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. संस्थेचे अध्यक्ष राजाभाऊ देशमुख यांच्या हस्ते मुख्य ध्वजारोहण सोहळा संपन्न झाला.सकाळी ठीक ८:३० वाजता मान्यवरांच्या उपस्थितीत ध्वजारोहण करण्यात आले. यानंतर राष्ट्रगीत आणि ध्वजगीत होऊन तिरंग्याला मानवंदना देण्यात आली. याप्रसंगी संस्थेतील विद्यार्थ्यांनी विविध देशभक्तीपर गीते सादर केली. तसेच काही विद्यार्थ्यांनी प्रजासत्ताक दिनाचे महत्त्व सांगणारी प्रभावी भाषणे दिली. आपल्या ओघवत्या वाणीने आणि कलागुणांनी विद्यार्थ्यांनी उपस्थितांची मने जिंकली.या सोहळ्याला परिसरातील विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी उपस्थिती लावून विद्यार्थ्यांचा उत्साह वाढवला. कार्यक्रमास प्रामुख्याने खालील मान्यवर उपस्थित होते:

राजाभाऊ देशमुख (अध्यक्ष, जनविकास शिक्षण संस्था)रमेश जाधव (नगरसेवक),साळुबा लोखंडे (पालक प्रतिनिधी),काकासाहेब साबबे,अंकुश सुरासे (सरव्यवस्थापक, गणपती बँक),यांच्यासह संस्थेचे प्राचार्य, उपप्राचार्य, प्रशासकीय अधिकारी, प्राध्यापक वृंद, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संस्थेतील सर्व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. मोठ्या संख्येने उपस्थित असलेले पालक आणि विद्यार्थी यांच्यामुळे शालेय परिसर देशमय झाला होता. ध्वजारोहणानंतर उपस्थितांना अल्पोपहार वाटप करण्यात आले.

# जालना जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी प्रशासन कटिबद्ध : पालकमंत्री पंकजा मुंडे

## ७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त जालना पोलीस मुख्यालय मैदानावर मुख्य शासकीय ध्वजारोहण संपन्न; विविध योजनांच्या लाभार्थ्यांचा गौरव



**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना /प्रतिनिधी**/ जालना जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी, प्रगतीसाठी आणि शासनाच्या सर्व लोककल्याणकारी योजना तळागाळातील नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत, असे प्रतिपादन राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजा गोपीनाथ मुंडे यांनी केले.भारताच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त जालना येथील पोलीस मुख्यालय मैदानावर आयोजित मुख्य शासकीय ध्वजारोहण सोहळ्यात त्या बोलत होत्या.

ध्वजारोहणानंतर उपस्थित नागरिकांना संबोधित करताना पालकमंत्री म्हणाल्या की, २६ जानेवारी १९५० रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी देशाला अर्पण केलेली राज्यघटना हा आपल्या लोकशाहीचा दीपस्तंभ आहे. जालना जिल्ह्याचा विकास हाच आपला मुख्य ध्यास असून, जिल्ह्याने विविध क्षेत्रांत केलेल्या प्रगतीबद्दल आपल्याला सार्थ अभिमान आहे.पालकमंत्र्यांनी आपल्या भाषणात शासनाच्या विविध योजनांचा धावता आढावा घेतला.कृषी क्षेत्र: सन २०२५-२६ मध्ये कृषी विभागामार्फत १५ हजार शेतकऱ्यांना ७६ कोटी रुपयांचा लाभ देण्यात आला.



जलयुक्त शिवार २.० अंतर्गत १२४८ कामे पूर्ण झाली आहेत.अंबड आणि घनसावंगी येथे लवकरच १०० खाटांची रुग्णालये सुरू होणार आहेत. ३० जानेवारीपासून 'स्पर्श' कुष्ठरोग जनजागृती अभियान राबवले जाणार आहे. जिल्ह्यातील २० शाळांची 'पीएम श्री शाळा' योजनेत निवड करण्यात आली असून 'सक्षम जालना' आणि 'पढो जालना' सारखे उपक्रम राबवले जात आहेत.

रोजगार आणि ऊर्जा: मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेतून १६५० युवकांची निवड झाली असून, सौर कृषी वाहिनी योजनेअंतर्गत ८४ मेगावॅटचे प्रकल्प कार्यान्वित झाले आहेत.या सोहळ्यात पालकमंत्र्यांच्या हस्ते विविध क्षेत्रांतील गुणवंतांचा सत्कार करण्यात आला: १. वीरपत्नींचा सन्मान: शहीद सैनिक किशोर पारवे यांच्या वीरपत्नी श्रीमती कविता पारवे यांना 'ताम्रपट' देऊन सन्मानित करण्यात आले. २. पोलीस दल: पोलीस उपनिरीक्षक भगवान नरोडे (पोलीस ठाणे, अंबड) यांना 'केंद्रीय गृहमंत्री दक्षता पदक' प्रदान करण्यात आले. ३. क्रीडा आणि युवा: जिल्हा क्रीडा गुणवंत पुरस्कार रोहन वाघमारे (तलवारबाजी), आदित्य घुले (बुद्धिबळ) व एकनाथ सुराशे (सॉफ्टबॉल) यांना प्रदान करण्यात आले. ४. विद्यार्थी सत्कार: इन्स्पायर अवॉर्डसाठी निवड झालेल्या साक्षी नऱ्हेडा व आरुषी काकरवाल यांच्यासह रस्ता सुरक्षा प्रश्नमंजुषा स्पर्धे तील विजेत्यांचा गौरव करण्यात आला.

कार्यक्रमात महिला व बालविकास विभागातर्फे 'बालविवाह मुक्त भारत' ही शपथ उपस्थितांना देण्यात आली. जिल्ह्यात १५२ बालविवाह रोखण्यात यश आल्याबद्दल पालकमंत्र्यांनी प्रशासनाचे कौतुक केले. तसेच आगामी १० वी व १२ वीच्या परीक्षा तणावमुक्त आणि 'कॉपीमुक्त' वातावरणात देण्याचे आवाहन त्यांनी विद्यार्थ्यांना केले.या सोहळ्याला आमदार राजेश राठोड, अर्जुन खोतकर, बबनराव लोणीकर, नारायण कुचे, जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम., पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी विविध विभागांनी काढलेल्या चित्ररथांनी आणि शालेय विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमांनी उपस्थितांची मने जिंकली.

## पळशी जिल्हा परिषद शाळेत ७७ वा प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा; विद्यार्थ्यांचे बहारदार सांस्कृतिक कार्यक्रम

**आत्ताच एक्सप्रेस**

**पळशी (प्रतिनिधी)** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पळशी येथे ७७ वा प्रजासत्ताक दिन अत्यंत उत्साहात आणि चैतन्यमय वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध कलागुणांनी उपस्थित पालकांची व ग्रामस्थांची मने जिंकली.



देशभक्तीच्या वातावरणात विद्यार्थ्यांनी विविध प्रात्यक्षिके सादर केली. यामध्ये संगीत कवायत व लेझीम: लयाबद्ध हालचाली आणि ढोलाच्या तालावर विद्यार्थ्यांनी लेझीमचे उत्कृष्ट सादरीकरण केले.शालेय विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीतांवर नृत्य सादर केले. तसेच, लहान मुलांनी आपल्या ओघवत्या भाषणातून क्रांतीकारकांच्या आठवणींना उजाळा दिला.

विद्यार्थ्यांचा उत्साह द्विगुणित करण्यासाठी आणि त्यांच्या गुणांचे कौतुक करण्यासाठी श्रीकृष्णा मोटे (भाजपा युवा मोर्चा तालुका उपाध्यक्ष, परतूर तथा सदस्य ग्रामपंचायत फुलवाडी-पळशी) यांच्या वतीने सर्व विद्यार्थ्यांना बक्षिसांचे वाटप करण्यात आले.

यावेळी बोलताना त्यांनी विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या व ग्रामीण भागातील कलागुणांना प्रोत्साहन देणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन केले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शाळेचे मुख्याध्यापक होळसमुद्रे सर आणि श्रीमती सिरसाट मॅडम यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाला गावातील पालक, शिक्षणप्रेमी नागरिक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.प्रजासत्ताक दिनाच्या या सोहळ्यामुळे संपूर्ण पळशी परिसरात उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.


## । जाहिरप्रगटन ।

या जाहीर प्रगतनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, नागपूर वनविभागातील श्री.पंचानभाई प्रेमजी पटेल रा. प्लॉट नं. १०७ व ४०१ अशोक ईलाईट लकडगंज, नागपूर यांची **रमणी टिंबर मार्ट** पत्ता प्लॉट क्र. १०८ एव्हीजी लेआऊट लकडगंज, नागपूर या आरागिरणी मधील जुना परवाना क्र. १६३/१९७६ व नवीन परवाना क्र. १६/१९९९ आयडी क्र. एमएच ०४३१ एनजीएनजी या आरागिरणी वरील आडवे ४२ इंच एक व उभे ४२ इंच दोन असे एकूण तीन आरायंत्रासह **श्री. गणेश हिरालाल किल्लेदार रा. फुलंब्रीकर नाट्यगृह समोर बस स्टॉप जालना** यांनी कायमस्वरुपी खरेदी केली असून, खरेदी नंतर संभाजीनगर वनपरिक्षेत्रातील वनपरिक्षेत्र अधिकारी जालना उत्तर यांचे कार्यक्षेत्रामध्ये मौ. जालना ता. जि. जालना येथील गट क्र. ५८/२ या ठिकाणी **जय सॉमील अँड पॅकेजींग जालना** या नावाने आरागिरणी परवाना हस्तांतर, नामांतर व स्थलांतर करणे बाबत विनंती अर्ज या कार्यालयास सादर केला आहे.

सदर आरागिरणी परवाना हस्तांतर, नामांतर व स्थलांतर करण्यासंबंधी कोणाचा काही उजर अथवा आक्षेप असल्यास हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झालेपासुन १५ दिवसाचे आत लेखी पुराव्यासह, **उपवनसंरक्षक, प्रादेशिक वनविभाग छत्रपती संभाजीनगर, वनभवन, उस्मानपुरा रेल्वेस्टेशन रोड छत्रपती संभाजीनगर अथवा वनपरिक्षेत्र अधिकारी प्रादेशिक जालना उत्तर देपुळगांव राजा रोड कन्हैया नगर, जालना** यांचे पत्त्यावर सादर करावे. विहीत मुदतीत उजर हक्क/आक्षेप वरील पत्त्यावर प्राप्त झाले नाही तर नियमानुसार सदर आरागिरणी परवाना खरेदीने **श्री. गणेश हिरालाल किल्लेदार रा. फुलंब्रीकर नाट्यगृह समोर बस स्टॉप जालना यांचे नांवावर हस्तांतर करण्याची कार्यवाही करण्यात येईल.**

**स्वाक्षरीत/-**
**(श्रीमती सुवर्णा माने) भा.व.से.**
**उप वनसंरक्षक (प्रा.)**
**वन विभाग छत्रपती संभाजीनगर**


### जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते ध्वजारोहण

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना /प्रतिनिधी**/ भारताच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले.

यावेळी अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, निवासी उपजिल्हाधिकारी तथा अपर जिल्हा दंडाधिकारी शशिकांत हदगल, जिल्हा पुरवठा अधिकारी सविता चौधर, उपजिल्हाधिकारी मनिषा दांडगे, उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे, यांच्यासह विविध विभागातील अधिकारी व कर्मचारी यांची उपस्थिती होती.

## जालना जिल्ह्याच्या ३५९ कोटी २४ लाखांच्या प्रारूप आराखड्यास मंजुरी

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना /प्रतिनिधी**/जालना जिल्ह्याच्या विकासाला गती देण्यासाठी सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरिता ३५९ कोटी २४ लाख रुपयांच्या जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) प्रारूप आराखड्यास आज जिल्हा नियोजन समितीच्या (उ्झऊ) बैठकीत मंजुरी देण्यात आली. राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री पंकजा गोपीनाथ मुंडे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन भवन येथे ही बैठक संपन्न झाली.महत्त्वाच्या मान्यवरांची उपस्थितीया बैठकीला राजकीय आणि प्रशासकीय क्षेत्रातील प्रमुख मान्यवर उपस्थित होते, ज्यात:लोकप्रतिनिधी: खासदार कल्याण काळे, आमदार राजेश राठोड, अर्जुन खोतकर, बबनराव लोणीकर, नारायण कुचे, संतोष दानवे, हिकमत उढाण, जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम., पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल, अप्पर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल आणि जिल्हा नियोजन अधिकारी सुचित कुलकर्णी.नियोजन आराखडा २०२६-२७: एक दृष्टिक्षेपबैठकीत आगामी वर्षाच्या निधी नियोजनावर सविस्तर चर्चा करण्यात आली. शासनाने आखून दिलेल्या मर्यादेनुसार खालीलप्रमाणे तरतूद प्रस्तावित आहे:योजना




घटकशासन मर्यादा/तरतूद (कोटी )जिल्ह्याची मागणी (कोटी )जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण)३५९.२४७२९.६६अनुसूचित जाती उपयोजना७६.००७६.००आदिवासी उपयोजना२.९७२.९७ एकूण ४३८.२१८०८.६३

### पालकमंत्री पंकजा मुंडे यांचे निधी १००% खर्च करण्याचे निर्देश

पालकमंत्री पंकजा मुंडे यांनी स्पष्ट केले की, जिल्ह्याची मागणी ८०८ कोटी रुपयांहून अधिक असली तरी सध्या ४३८ कोटींची मर्यादा आहे. मात्र, राज्यस्तरीय बैठकीत या आराखड्यात भरीव वाढ करण्याची शिफारस करण्यात येईल, जेणेकरून जिल्ह्यातील विकासकामांसाठी अधिक निधी उपलब्ध होईल.मार्चअखेर निधी खर्चाचे आव्हानसन २०२५-२६ च्या चालू आर्थिक वर्षातील निधी खर्चाचा आढावा घेताना पालकमंत्र्यांनी नाराजी व्यक्त केली. आतापर्यंत वितरित करण्यात आलेल्या १३२ कोटी ७२ लाख रुपयांपैकी केवळ ४३.५५ टक्के (५७ कोटी ८० लाख रुपये) निधी खर्च झाला आहे.मार्च अखेरपर्यंत सर्व शाखांनी १०० टक्के निधी खर्च करणे बंधनकारक आहे. उर्वरित दोन महिन्यांत प्रशासकीय मान्यतांची प्रक्रिया पूर्ण करून कामांना गती देण्याचे निर्देश पालकमंत्र्यांनी दिले

.विकासाच्या विविध मुद्द्यांवर चर्चाबैठकीत केवळ निधीच नव्हे तर प्रत्यक्ष अंमलबजावणीवरही भर देण्यात आला. यात प्रामुख्याने:आरोग्य केंद्रांचे सक्षमीकरण आणि रस्त्यांची कामे.वन विभागाची वृक्ष लागवड आणि जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे प्रकल्प.लोकप्रतिनिधींच्या मतदारसंघातील प्रलंबित विकासकामांना निधी मिळवून देणे. केंद्र व राज्य शासनाच्या योजनांची जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी.पालकमंत्र्यांचा गौरवकार्यक्रमाच्या सुरुवातीला, पुणे येथील अजिंक्य डी. वाय. पाटील विद्यापीठाने पंकजा मुंडे यांना 'मानद डॉक्टरेट' पदवी बहाल केल्याबद्दल सर्व खासदार, आमदार आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिनंदन केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि सूत्रसंचालन जिल्हा नियोजन अधिकारी सुचित कुलकर्णी यांनी केले. या बैठकीस जिल्ह्यातील विविध विभागांचे प्रमुख अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राष्ट्रमाता इंदिरा गांधी महाविद्यालयात प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना /प्रतिनिधी**/ येथील राष्ट्रमाता इंदिरा गांधी कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात २६ जानेवारी २०२६ रोजी भारतीय प्रजासत्ताक दिन अत्यंत उत्साहात आणि देशप्रेमाच्या वातावरणात साजरा करण्यात आला.प्रजासत्ताक दिनानिमित्त आयोजित मुख्य सोहळ्यात संस्थेचे उपाध्यक्ष तथा स्थानिक नियामक मंडळाचे अध्यक्ष प्रा. सत्संग नारायणराव मुंढे यांच्या हस्ते सकाळी ठीक ७:३० वाजता ध्वजारोहण करण्यात आले. राष्ट्रध्वजाला मानवंदना देत उपस्थित सर्वांनी राष्ट्रगीत गायले.

या प्रसंगी व्यासपीठावर महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. सुनंदा तिडके यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, राष्ट्रीय सेवा योजना (NSS) विभागाचे समन्वयक डॉ. सोमीनाथ खाडे यांनीही विशेष अतिथी म्हणून आपली उपस्थिती दर्शवली. कार्यालयीन अधीक्षक अर्जुन भाबड आणि संतोष साबळे यांचीही या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे शिस्तबद्ध ध्वजसंचलन प्रा. विजय तिडके यांनी केले. या सोहळ्यासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विशेष म्हणजे, आश्लेषा इंग्लिश स्कूलचे शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थी देखील या सोहळ्यात सहभागी झाले होते, ज्यामुळे कार्यक्रमाची शोभा अधिकच वाढली.कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी देशसेवेची शपथ घेतली. राष्ट्रमाता



इंदिरा गांधी महाविद्यालयाच्या या उपक्रमाचे परिसरातून कौतुक होत आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट अॅण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813